आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१८ जुलै २०२४ - गुरुवार

नीट युजी परीक्षा पुन्हा घ्यायची झाली तर त्याकरता ठोस कारणं हवीत असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. नीट युजी परीक्षेत गैरप्रकार झाल्यापरकरणी दाखल ४० याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होत आहे. या घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या केंद्रीय अन्वेषण संस्थेनं आतापर्यंतच्या चौकशीचा अहवाल आज बंद लिफाफ्यातून न्यायालयासमोर सादर केला. तो आताच जाहीर केला तर पुढच्या तपासावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असल्याचं सीबीआयने म्हटलं आहे. अशा प्रकारच्या परीक्षेत गैरप्रकार घडण्याचे गंभीर सामाजिक दुष्परिणाम होतात अशा शब्दात न्यायालयाने चिंता व्यक्त केली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी पारडीवाला, आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर आज दिवसभर सुनावणी चालणार आहे. दरम्यान, नीट पेपर फुटी प्रकरणी सीबीआयने पाटणा एम्समधल्या ४ विद्यार्थ्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे.

<><><><><>

दरम्यान, छत्तीसगडमध्ये विजापूर आणि सुकमा जिल्ह्याच्या सीमेजवळ काल रात्री माओवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात पोलिसांच्या विशेष कार्यदलाचे दोन जवान  शहीद झाले तर चार जवान जखमी झाले.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात एटापल्ली तालुक्यातल्या जारावंडी क्षेत्रांतर्गत छत्तीसगड सीमेलगतच्या वांडोली नजीकच्या जंगल परिसरात काल झालेल्या चकमकीत १२ नक्षली ठार झाले. त्यात ७ पुरुष आणि २ महिलांचा समावेश असून, सर्वांची ओळख पटली आहे. या १२ जणांवर मिळून ३० लाख रुपयांचं बक्षीस होतं. या कारवाईमुळे उत्तर गडचिरोलीत सक्रिय टिपागड एलओएस आणि चातगाव-

कसनसूर या नक्षल्यांच्या दोन दलमचा बीमोड झाल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं.या चकमकीत जखमी झालेल्या पोलिसांवर नागपूरच्या रुग्णालय़ात उपचार सुरु असून त्यांच्या प्रकृतीचा धोका टळला असल्याचं नीलोत्पल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या विशाळगडावर अतिक्रमण निर्मूलन मोहिमेदरम्यान समाजकंटकांनी घातलेला हैदोस निंदनीय असून जिल्हा पोलीस प्रमुख आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे प्रकरण घडलं. त्यामुळे जिल्हा पोलीस प्रमुखांना तात्काळ निलंबित करावं, तसंच नुकसानग्रस्तांना सरकारनं मदत करावी, अशी मागणी विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यासंदर्भात चौकशीच्या मागणीचं पत्र सरकारला दिलं आहे, असं वडेट्टीवार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यात येत्या २५ जुलै रोजी प्रारूप यादी प्रसिद्ध होणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. या यादीत आपलं नाव नसेल तर ते समाविष्ट करण्यासाठी मतदारांना ९ ऑगस्टपर्यंतची मुदत दिली आहे. मतदार या कालावधीत यादीतल्या नावांमध्ये दुरुस्ती, पत्त्यामध्ये बदल, नाव वगळणीही करू शकतील. ९ ऑगस्टनंतर ही प्रारुप यादी अंतिम केली येईल आणि २० ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

वादग्रस्त आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर यांची आई मनोरमा खेडकर यांना रायगड जिल्ह्यात पौड इथल्या पोलिसांनी काल अटक केली. एका शेतकऱ्याला बंदूक रोखून धमकावल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या प्रकरणी संबंधित शेतकऱ्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. तेव्हापासून मनोरमा फरार होत्या.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात तसंच कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण किनारपट्टीवर जोरदार वारा वाहण्याची शक्यता आहे. घाट विभागात तुरळक ठिकाणी खूप जोरदार पाऊस होण्याचा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

<><><><><>

राज्याच्या विविध भागांत पावसानं जोर धरला आहे.

**मुंबईत** काल रात्रीपासून मुसळधार पावसानं हजेरी लावली. शहरातले रस्ते आणि पुलांवर पाणी साचल्यामुळे आज सकाळी अनेक ठिकाणी वाहतुक कोंडी दिसून आली, मात्र सर्व उपनगरी रेल्वे मार्गांवरची सेवा सुरळीत सुरु आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात काल दुपारपासून पावसानं पुन्हा जोर धरला असून, आजही तो कायम आहे. जिल्ह्यात आतापर्यंत वार्षिक सरासरीच्या ६० टक्के पाऊस झाला आहे. खेड मधली जगबुडी आणि लांज्यातली काजळी या नद्या धोक्याच्या पातळी वरून वाहत आहेत.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरु आहे, त्यामुळे जिल्ह्यातल्या तेरेखोल, गड, कर्ली, वाघोटन या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तेरेखोल नदी

धोक्याच्या पातळी वरून वाहत असून प्रशासनानं नदी काठावरच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**परभणी** जिल्ह्यात जिंतूर तालुक्यातल्या जोगवाडा सोस परिसरात अती मुसळधार पावसामुळे शेतातल्या उभ्या पिकाचं मोठं नुकसान झालं आहे. महसूल विभागानं नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

**भंडारा** जिल्ह्यात गोसेखुर्द धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस सुरु आहे.

**//<><><><><>//**